पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ४**

सभावृत्तांत

दिनांक - ०३/०९/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०३/०९/२०१४** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.आर.एस.कुमार
२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
३. मा.आसवाणी सविता धनराज

या शिवाय मा.गावडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले - प्र.समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने उपस्थित सन्मा.सदस्य यांनी मंगळवार दिनांक ०९/०९/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा.पर्यंत सभा तहकूब केली.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ४**

सभावृत्तांत

( दिनांक ०३/०९/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - ०९/०९/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक ०३/०९/२०१४ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **०९/०९/२०१४** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२. मा.नेटके सुमन राजेंद्र
३. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४. मा.आसवाणी सविता धनराज
५. मा.जवळकर वैशाली राहुल
६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.गावडे, मा.दंडवते - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.चौरे, मा.तुपसाखरे, मा.चिल्लाळ - उपअभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

दिनांक **२०/०८/२०१४** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमाक ३)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - १

दिनांक - ०९/०९/२०१४

सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ : १) मा.चारुशिला कुटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय - आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर योजनेनुसार आकुर्डी येथील सर्वे नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले असल्याने फेरबदलाची कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत.....

विषय क्रमांक १ चा विचार दिनांक **१९/११/२०१४** रोजी होणा-या सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - २१ विषय क्रमांक - २
दिनांक - ०९/०९/२०१४ विभाग - अ प्रभाग कार्यालय
सुचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.सविता आसवाणी
संदर्भ : १) मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/२४/२०१४, दि.१५/०१/२०१४
२) मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २२०, दिनांक ०८/०१/२०१४
विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९९५ च्या विकास आराखडयानुसार आकुर्डी येथील स.नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. १८ गुंठे रिकाम्या जागेचे भूसंपादन प्रक्रीया सुरु करणेस व ज्या जागेमध्ये बांधकामे झालेली आहेत ती जागा आरक्षणामधून वगळणेबाबत....

विषय क्रमांक २ चा विचार दिनांक **१९/११/२०१४** रोजी होणा-या सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - ३
दिनांक - ०९/०९/२०१४ विभाग - अ प्रभाग कार्यालय
सुचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.सुमन नेटके
संदर्भ : मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/२६१/२०१४, दि.२१/०८/२०१४

मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २५ दिनांक १०/०७/२०१४ नुसार प्रभाग क्र.१५ दत्तवाडी मधील क्रांतीनगर भागात मस्जिदसमोर असणा-या आरक्षण क्र.५४७ ची जागा भूसंपादित करुन त्या ठिकाणी महापालिकेची योजना राबविणेस मान्यता देणेकामी तसेच आरक्षण क्रमांक ५४७ ची जागा भूसंपादित करुन त्या ठिकाणी महापालिकेची योजना राबविणेकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक - ४
दिनांक - ०९/०९/२०१४ विभाग - अ प्रभाग कार्यालय
सुचक - मा.अश्विनी चिंचवडे-पाटील अनुमोदक - मा.वैशाली जवळकर
संदर्भ : मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/२६१/२०१४, दि.२१/०८/२०१४

मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २८ दिनांक १०/०७/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१९ किवळे येथील सर्व्हे नं.९२ येथे स्मशानभूमीकडे जाणा-या १२ मी.रस्त्याचे आरक्षण प्रस्तावित केले आहे. या आरक्षणामुळे येथील कायम स्वरुपी रहिवाशी असलेल्या लोकांची घरे बाधीत होणार आहेत. महापालिकेने यापूर्वी जाहिर केलेल्या प्रारुप आराखडयामध्ये हा १२ मी. रस्ता सर्व्हे नं.९१ मध्ये होता. सर्व्हे नं.९१ मध्ये कोणतेही घर नाही व नंतर पालिकेने विकास आराखडयात हा रस्ता सर्व्हे नं.९१ व ९२ च्या सिमेवरुन टाकणेत आला आहे. त्यामुळे सर्व्हे नं.९२ ची घरे व शेतक-यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे हा रस्ता महानगरपालिका

नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन पूर्वीच्या सर्व्हे नं.९१ मधील मोकळया जागेमध्ये स्थलांतरीत करणेस तसेच सर्व्हे नं.८२ किवळे १८ मी. रस्त्याचे आरक्षण आहे. त्यामुळे एका शेतक-यावर अन्याय होत आहे. त्यामुळे तो रस्ता सर्व्हे नं.८१ व ८२ मध्ये समांतर टाकणेबाबत पुढील कार्यवाही करणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहेत. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( छाया जगन्नाथ साबळे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिति
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७६८/२०१४
दिनांक : ०९/०९/२०१४

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.